आयोगाने वरील प्रकरणांचा संबंध ३ अभ्यास शाखाशी जोडलेला आहे – (१) अर्थव्यवस्था व नियोजन, (२) विकास विषयक अर्थशास्त्र आणि कृषी आणि (३) विज्ञान व तंत्रज्ञान विकास. मात्र यातील अनेक उपविषयांची पुनरावृती झालेली असल्याने अभ्यासाच्या सुलभतेसाठी त्याचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण (१९ प्रकरणे) करता येते –

## १) समग्रलक्षी अर्थशास्त्र

१) समग्रलक्षी अर्थशास्त्र
२) वृद्धी आणि विकास
३) आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवल +
  * आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवल (भारतीय अर्थव्यवस्था–८)

## २) भारतीय अर्थव्यवस्था व नियोजन

१) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा
२) मुद्रा, मौद्रिक व वित्तीय क्षेत्र +
  * मुद्रा / पैसा (समग्रलक्षी अर्थशास्त्र – २)
३) सार्वजनिक वित्त आणि वित्तीय संस्था +
  * सार्वजनिक आयव्यय (समग्रलक्षी अर्थशास्त्र – ३)
४) उद्योग व सेवा क्षेत्र
५) पायाभूत सुविधा विकास
६) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

## ३) कृषी अर्थशास्त्र, सहकार आणि अन्नपोषणआहार

१) भारतीय शेती व ग्रामीण विकास +
  * भारतीय शेती व ग्रामीण विकास (भारतीय अर्थव्यवस्था – २)
२) ग्रामीण कर्जबाजारीपणा व कृषी पतपुरवठा
३) सहकार (भारतीय अर्थव्यवस्था – ३)
४) अन्न व पोषणआहार

## ४) विज्ञान व तंत्रज्ञान विकास

१) ऊर्जा विज्ञान
२) संगणक व माहिती तंत्रज्ञान
३) अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान
४) जैवतंत्रज्ञान
५) भारताचा आण्विक कार्यक्रम
६) आपत्ती व्यवस्थापन

# सामान्य अध्ययन पेपर (४) च्या अभ्यासाची दिशा

सामान्य अध्ययन पेपर–४ मध्ये मागील परीक्षामध्ये विचारल्या गेलेल्या प्रश्नांची संख्या पुढीलप्रमाणे होती –

१) समग्रलक्षी अर्थशास्त्र (३० प्रश्न)
२) भारतीय अर्थव्यवस्था व नियोजन (४५ प्रश्न)
३) कृषी अर्थशास्त्र, सहकार आणि अन्नपोषणआहार (३५ प्रश्न)
४) विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास (४० प्रश्न)

पेपर ४ मध्ये नमूद असलेल्या घटक व उपघटकांची संख्या राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमातील इतर पेपरपेक्षा जास्त असल्याने या विषयाच्या तयारीसाठी उमेदवारांना जास्त वेळ द्यावा लागतो.

सदर पेपरमधील तीन प्रमुख घटकांमध्ये एकूण २३ प्रकरणांचा समावेश असून त्या अंतर्गत विविध बाबींचा समावेश होतो. यातील अनेक उपघटकांची पुनरुक्ती विविध घटकामध्ये झालेली असल्याने हा पेपर विस्तृत वाटतो. ते सर्व एकत्र केल्यास अभ्यासात सुसंगती येऊन वेळ कमी लागतो. तसेच मूळ इंग्रजीतील मराठी भाषांतर हे काही मुद्यांबाबत खटकणारे असले तरी इंग्रजीतील संज्ञांचा आधार घ्यावा.

या विषयातील सर्व घटकांतील अनेक संकल्पना उपयोजित व सद्य:स्थितीतील संदर्भासह अभ्यासाव्यात. शासनाची यंत्रणा, कार्यक्रम व धोरणे यावर भर द्यावा, कारण देशापुढील प्रमुख समस्या व आव्हाने, त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यासक्रमात समावेश आहे. उदा–सार्वजनिक खासगी सहकार्य प्रारूप, परकीय थेट गुंतवणूक, विशेष आर्थिक क्षेत्र. अभ्यास करताना अर्थव्यवस्थेतील मूलभूत संकल्पना, शासकीय यंत्रणा व कार्यक्रम यावर भर द्यावा.

विज्ञान व तंत्रज्ञान विकास घटकात भारताचे महत्त्वाचे विज्ञान तंत्रज्ञानविषयक कार्यक्रम, धोरणे व उपाययोजना तसेच भारताच्या आण्विक धोरणाचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम उपयोजित असून आपत्ती व्यवस्थापनाच्या काही केस स्टडीजचा त्यात समावेश आहे. या घटकाअंतर्गत ऊर्जा, संगणक व माहिती तंत्रज्ञान, अवकाश तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, भारताचे आण्विक धोरण व आपत्ती व्यवस्थापन या ६ उपघटकांचा समावेश आहे. या उपघटकामध्ये समाविष्ट असणाऱ्या संकल्पनांचे वस्तुनिष्ठ आकलन व संकल्पनांच्या उपयोजनांसंदर्भातील अद्ययावत माहितीचे संकलन करावे. या विभागात सर्वात जास्त प्रश्न हे जैवतंत्रज्ञान विभागावर, होते, तर सर्वात कमी प्रश्न ऊर्जा घटकावर होते.

**राज्यसेवा मुख्य परीक्षेतील हा पेपर सर्वात जास्त विस्तृत आहे. त्यामुळे या विषयाची तयारी करताना उमेदवारांनी खालील बाबीकडे लक्ष द्यावे –**

* अभ्यासक्रमाचा आवाका विस्तृत सल्यामुळे प्रत्येक घटक व उपघटकाचे आकलन अत्यंत नेमकेपणाने करावे.
* राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सर्व पेपरमध्ये स्वतंत्ररीत्या उत्तीर्ण होण्याची किमान गुणमर्यादा निश्चित असून ३:१ अशी नकारात्मक गुणप्रणाली आहे. परिणामी अभ्यासाची योग्य व्यूहरचना करताना योग्य संदर्भाची निवड, संकल्पनांचे अचूक आकलन, लक्षात ठेवायची महत्त्वाची आकडेवारी व सद्य:स्थितीतील संदर्भाचा परिणामकारक वापर करावा.
* नकारात्मक गुणपद्धतीमूळे स्कोअरिंग, अचूकता व वेग या बाबी पेपरमध्ये महत्त्वाच्या ठरतात.
* अभ्यासक्रमातील सर्व मूलभूत संकल्पनांचे आकलन, त्यांचे विश्लेषण व उपायजोन त्यांचा सद्य:स्थितीतील घडामोडींशी असलेला सहसंबंध आणि दैनंदिन जीवनातील त्याचे महत्त्व यावर अधिक लक्ष केंद्रित करावे
* संकल्पनांच्या आकलनासाठी योग्य संदर्भसाहित्य वापरावे व परीक्षाभिमुख दृष्टिकोन विसरू नये. अनावश्यक वाचनाकडे दुर्लक्ष करावे.
* आकडेवारी संकलित करताना ती अद्ययावत व अधिकृत संदर्भातून घ्यावी. उदा. भारताचा आर्थिक पाहणी अहवाल, महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, महाराष्ट्र सांख्यिकी (स्टडी सर्कल), स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ व जनरल नॉलेज ही स्टडी सर्कलची मासिके, भारत व महाराष्ट्राचा अर्थसंकल्प, राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांच्या वेबसाइटवरील अधिकृत माहिती, इंडिया इयर बुक, शासकीय प्रकाशने, योजना, लोकराज्य इ.
* विद्यार्थ्यांनी स्वत:च्या नोटस तयार कराव्यात. त्यामुळे अभ्यास नेमका व जलद करणे शक्य होते. कमी कालावधीत उजळणी करण्याच्या दृष्टीने त्या उपयुक्त ठरतात. नोटस तयार करण्याअगोदर अभ्यासक्रमाचे काळजीपूर्वक आकलन करावे. मुद्याचे स्वरूप लक्षात घेऊन नोटस तयार केल्यास या नोटस अधिक उपयुक्त ठरतात. बहुपर्यायी परीक्षेत प्रश्नांचा अचूक पर्याय निवडण्यासाठी तुलनात्मक माहिती संकलित करावी.
* शासकीय कार्यक्रम, यंत्रणा व सद्य:स्थितीतील आकडेवारी लक्षात ठेवावी. त्याबाबतच्या नोंदी छोट्या डायरीमध्ये करून सदर माहितीची कायम उजळणी केल्यास ती अचूकपणे व कायमस्वरूपी लक्षात ठेवणे सोपे जाते. वर्तमानपत्रे व नियतकालिकांचे नियमित वाचन, माहितीचा व आकलनाचा आवाका विस्तृत करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरते.

# (३) आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय भांडवल

**१) आंतरराष्ट्रीय व्यापार**
**२) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत**
**३) भारताचा परकीय व्यापार**
**४) परकीय व्यापार धोरण**
**५) इ–व्यापार**
**६) परकीय भांडवल व तंत्रज्ञान**
**७) आंतरराष्ट्रीय वित्तपोषण संस्था**
**८) क्षेत्रीय व्यापार करार**
**९) जागतिक व्यापार संघटना**
**१०) परकीय व्यापारी कर्जे**
**११) आंतरराष्ट्रीय पतमापन संस्था आणि भारत**
**१२) भारतातील विनिमय दराचे व्यवस्थापन**

## १) आंतरराष्ट्रीय व्यापार

**१) वृद्धीचे इंजीन**

१) खालीलपैकी कोणते प्रतिरूप, भांडवल हा आर्थिक वाढीतील महत्त्वाचा घटक मानते?
१) हेक्स्चर – ओहलीन २) हॅरोड – डोमर ३) हाबर्लर ४) वरीलपैकी सर्व

२) रॉबर्ट सोलोच्या अनुसार खालीलपैकी कोणता घटक अमेरिकेतील १९०९ ते १९४९ मधील आर्थिक वाढीसाठी कारणीभूत होता ?
१) सर्वसाधारण शिक्षण २) संशोधन आणि विकास ३) औद्योगिकीकरण ४) तांत्रिक ज्ञान

## २) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत

**१) अभिजात आधुनिक सिद्धांत**

१) खालीलपैकी कोणती चाचणी हेक्स्चर ओहलिनच्या परकीय व्यापाराच्या सिद्धान्तासाठी केली गेली, जिचे परिणाम सिद्धांताच्या विरुद्ध आले ?
१) रिकार्डोचा सिद्धान्त २)शुल्टझ्चा विरोधाभास ३) नर्कस्चा विरोधाभास ४) लिओंटिफचा विरोधाभास

२) जागतिकीकरणाने व्यावसायिक पर्यावरण प्रभावित झाल्याबाबतचे पाच C बाबतचे निरीक्षण ........ यांचे आहे.
१) वॉल्टर आणि जैन २) ब्लॅकवेल आणि वॉल्टर ३) केनेची ओहम ४) जे. जे. डेस्टीफेनो

## ३) भारताचा परकीय व्यापार

**१) वृद्धी**
**२) रचना**
**३) दिशा**

१) मार्च २०१९ मध्ये मार्च २०१८ च्या तुलनेत भारतातून होणाऱ्या प्रमुख वस्तूगटांच्या निर्यातीत वाढ नोंदवण्यात आली.
a) रसायने b) अभियांत्रिकी वस्तू c) कपडे d) औषधे e) पेट्रोलियम वस्तू

निर्यातीतील त्यांच्या योगदानानुसार या वस्तूगटांचा योग्य क्रम आहे. .........

१) (e),(a),(d),(c),(b) २) (e),(d),(a),(c),(b) ३) (a),(b),(c),(d),(e) ४) (b),(a),(e),(c),(d)

२) भारतीय परकीय व्यापाराच्या तुटीच्या संकटामागील कारणे:

a) तेलाची वाढती आयात b) भांडवली वस्तू व आधुनिक तंत्राची आयात वाढ

c) रुपयाच्या विनिमय दरातील घसरण d) रुपयाच्या विनिमय दरातील वाढ

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (b), (d) विधाने योग्य आहेत २) (a), (c), (d) विधाने योग्य आहेत

३) (a), (d) विधाने योग्य आहेत ४) (a), (b), (c) विधाने योग्य आहेत

## ४) परकीय व्यापार धोरण

### १) निर्यात प्रोत्साहन उपक्रम

१) भारत सरकारने .......... येथील निर्यात प्रक्रिया क्षेत्रांचे विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये रुपांतर केले.

a) फाल्टा (पश्चिम बंगाल) b) विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) c) पणजी (गोवा) d) चेन्नई (तामिळनाडू)

वरीलपैकी कोणते पर्याय बरोबर आहेत ?

१) केवळ (a),(b) आणि (c) २) केवळ (b), (c) आणि (d)

३) केवळ (a),(b) आणि (d) ४) वरीलपैकी सर्व

२) सेझ कायदा २००५ ची प्रमुख उद्दिष्टे ........

a) वस्तू आणि सेवांच्या निर्यातीसाठी प्रोत्साहन b) व्यापारावरील निर्बंध काढणे.

c) निर्यात मर्यादित करणे. d) देशी आणि विदेशी स्रोतापासून गुंतवणुकीस प्रोत्साहन

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) आणि (b) २) फक्त (a) आणि (d) ३) फक्त (b) आणि (c) ४) फक्त (c) आणि (d)

## ५) इ-व्यापार

## ६) परकीय भांडवल व तंत्रज्ञान

### १) आर्थिक वृद्धीतील परकीय भांडवल व तंत्रज्ञानाची भूमिका
### २) विदेशी भांडवल प्रवाह – रचना व वृद्धी
### ३) शेअर बाजारातील परकीय गुंतवणूक – एफपीआय, एफडीआय

१) खालील विधाने विचारात घ्या :

a) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक अर्थव्यवस्थेची उत्पादन क्षमता वाढविण्यास मदत करते.

b) विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूक सट्टेबाजीच्या स्वरूपाची असते आणि अत्यंत अस्थिर असते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **योग्य** आहेत ?

१) केवळ (a) बरोबर आहे. २) केवळ (b) बरोबर आहे.

३) (a) आणि (b) बरोबर आहेत ४) (a) आणि (b) चूक आहेत.

## ७) बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका

१) खालील विधाने विचारात घ्या :
a) बहुराष्ट्रीय कंपन्या कमी विकसित राष्ट्रांना अपचलित तंत्रज्ञान हस्तांतरित करतात.
b) बहुराष्ट्रीय कंपन्या कमी विकसित राष्ट्रांना देशांतर्गत प्रतिबंधित वस्तू विक्री करतात.
c) बहुराष्ट्रीय कंपन्या स्थानिक आणि पालक कंपनीतील कर्मचाऱ्यांस भेदभाव करतात.
d) बहुराष्ट्रीय कंपन्या कमी विकसित राष्ट्रांना फक्त श्रमप्रधान तंत्रज्ञान हस्तांतरित करतात.
वरीलपैकी कोणते/ती विधान/चे योग्य आहेत ?
१) (a), (b) आणि (c) योग्य आहेत    २) (b), (c) आणि (d) योग्य आहेत
३) (c), (d) आणि (a) योग्य आहेत    ४) वरीलपैकी सर्व

## ८) आंतरराष्ट्रीय वित्तपोषण संस्था

१) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
२) जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय विकास संस्था
३) आशियाई विकास बँक

## ९) क्षेत्रीय व्यापार करार

**१) सार्क**
**२) आसियान**

१) भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहभागी होण्यास नकार दिल्याने .......... मध्ये होणारी सार्कची १९ वी बैठक रद्द करण्यात आली.
१) नोव्हेंबर २०१४    २) नोव्हेंबर २०१६    ३) जानेवारी २०१८    ४) ऑगस्ट २०१५

## १०) जागतिक व्यापार संघटना

**१) आंतरराष्ट्रीय व्यापार**
**२) आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आणि व्यापारविषयक गुंतवणूक उपाय**
**३) व्यापारविषयक बौद्धिक संपदा**

१) सर्वसाधारण बौद्धिक मालमत्ता अधिकार प्रकारामध्ये ........... अधिकारांचा समावेश होतो.
a) केवळ कॉपी राईटस् आणि पेटंटस राईटस
b) केवळ पेटंटस आणि ट्रेडमार्कस राईटस
c) केवळ ट्रेडमार्कस आणि कॉपी राईटस्
d) कॉपी राईटस्, पेटंटस, इंडस्ट्रियल डिझाईन व ट्रेडमार्कस राईटस्
**पर्यायी उत्तरे :**
१) (a) पर्याय बरोबर आहे    २) (b), (c) पर्याय बरोबर आहेत
३) (d) पर्याय बरोबर आहे    ४) यापैकी नाही

२) जागतिक व्यापार संघटना खालीलपैकी कोणत्या फेरीदरम्यान स्थापली गेली ?
१) दोहा फेरी    २) उरुग्वे फेरी    ३) जिनिव्हा फेरी    ४) बाली फेरी

३) अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा यांनी केलेल्या प्रादेशिक व्यापार कराराचे खालीलपैकी कोणते नाव आहे ?
१) इफ्टा (EFTA) २) नाफ्टा (NAFTA) ३) उफ्टा (UFTA) ४) गॅट (GATT)

### ११) परकीय व्यापारी कर्जे

### १२) आंतरराष्ट्रीय पतमापन संस्था आणि भारत

### १३) भारतातील विनिमय दराचे व्यवस्थापन

# (२) भारतीय अर्थव्यवस्था

## (१) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा

**१) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा**
**२) भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने**
**३) भारतातील नियोजन**
**४) भारतातील आर्थिक सुधारणा**

### १) भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा

### २) भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने

१) दारिद्य निर्मूलनाचे उपाय
२) बेरोजगारी निर्मूलनाचे उपाय
३) प्रादेशिक असमतोल

१) खालीलपैकी कोणते धोरण भारतातील दारिद्र्य निर्मूलनासाठी योग्य आहे ?
a) i) साकलिक कृषी विकास
ii) साकलिक क्षेत्रातील उत्पादकता आणि रोजगार गुणवत्ता वाढविणे
iii) शिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे गरिबांचे उत्थान करणे.
iv) चांगल्या आरोग्याच्या तरतुदीद्वारे उत्थान करणे.
b) i) गृहनिर्मितीसाठी तरतूद करणे.
ii) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे
iii) कौशल्य निर्मितीतून दारिद्र्य निर्मूलन
iv) चांगल्या वेतनदराची हमी देणे.

**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (a) योग्य आहे २) फक्त (b) योग्य आहे
३) (a) आणि (b) दोन्हीही योग्य नाहीत. ४) (a) आणि (b) दोन्हीही योग्य आहेत.

२) भारतातील रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि त्यांच्या प्रारंभ/घोषणा दिनांक-वर्ष खाली दिलेले आहे. योग्य जोड्या लावा.

| युनिट – I | युनिट – II |
|---|---|
| a) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) | i) डिसेंबर १, १९९७ |
| b) प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) | ii) ऑगस्ट २०१३ |

c) स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (SJSRY) iii) डिसेंबर २५,२०००

d) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSS) iv) ऑगस्ट १४, २००८

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| **१)** | **(iii)** | **(iv)** | **(i)** | **(ii)** |
| २) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| ३) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| ४) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

३) डिसेंबर १९९७ पासून सुरु झालेली स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना ही खालीलपैकी कोणत्या योजनांचे एकत्रीकरण आहेत ?

१) नेहरू रोजगार योजना, गरिबांची नागरी मूलभूत सुविधा योजना आणि प्रधानमंत्र्यांच्या एकात्मिक नागरी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

२) जवाहर ग्राम समृद्धी योजना, कामासाठी अन्नधान्य कार्यक्रम आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम.

३) स्वर्णजयंती ग्राम स्व-रोजगार योजना, ट्रायसेम आणि कृषी सेवा केंद्र

४) वरीलपैकी काहीही नाही

४) भारतातील बेरोजगारीच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान खरे नाही ?

१) भारतात अजून छुपी बेरोजगारी आहे.

२) भारतात चक्रीय बेरोजगारी आहे.

३) भारतातील बेरोजगारी मुख्यत्वेकरून संरचनात्मक आहे.

४) भारतातील रोजगार विषयक आकडेवारी गोळा करणारी एन.एस.एस.ओ. ही महत्त्वाची संस्था आहे.

## ३) भारतातील नियोजन

१) नियोजनाचे प्रकार व तर्काधार

२) नियोजन आयोग

३) नीती आयोग

## ४) भारतातील आर्थिक सुधारणा

**१) आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी**

**२) उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण - संकल्पना, अर्थ, व्याप्ती व मर्यादा**

**३) केंद्र आणि राज्यातील सुधारणांची असमानता**

१) खालील विधाने भारतातील आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीशी संबंधित आहेत.

a) आर्थिक सुधारणांचा मुख्य जोर हा बाजारपेठेला मध्यवर्ती निर्णयकर्ता बनवणे असा होता.

b) आर्थिक सुधारणांच्या अंतर्गत, अर्थव्यवस्थेची पुनर्रचना ही केंद्रीकृत नियोजनाने केली गेली.

c) देशाची अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्यासाठी रुपया हा पूर्णपणे परिवर्तनीय केला गेला.

d) भारतीय अर्थव्यवस्थेत सुधारणा घडवण्याचे प्रयत्न १९८० च्या मध्यापासून सुरु झाले.

वरीलपैकी कोणती विधाने खरी नाहीत ?

१) (a), (b) आणि (d) २) (b),(c) आणि (d) ३) (b) आणि (c) आणि ४) (a) आणि (c)

२) भारतातील रचनात्मक समायोजन कार्यक्रमात आर्थिक सुधारणा करण्यासाठी खालील घटकांचा समावेश होतो.

a) व्यवहार तोलातील समायोजन

b) व्यापार आणि भांडवल ओघ सुधारणा

c) औद्योगिक नियंत्रण मुक्त d) चलनवाढ नियंत्रण

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (a) आणि (b) २) केवळ (b) आणि (c) ३) केवळ (c) आणि (d) ४) केवळ (a) आणि (d)

३) निर्गुंतवणुकीची रणनीतिक – Strategic विक्री पद्धती म्हणजे खालीलपैकी कोणते विधान ?

१) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे शेअर्स हे किरकोळ गुंतवणूकदार किंवा संस्थांना विकले जातात.

२) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे शेअर्स हे एखाद्या कार्यक्षम खाजगी भागीदाराला विकले जातात.

३) उपक्रमाचे व्यवस्थापन आणि कर्मचारी स्वत: उपक्रमाचे शेअर्स विकत घेतात.

४) वरीलपैकी कोणतेही नाही

४) २०१४ मध्ये ........क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीस परवानगी दिली.

१) शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ २) औष्णिक ऊर्जा

३) कोळसा आणि लिग्नाईट ४) रेल्वेच्या पायाभूत सुविधा

# (२) मुद्रा, मौद्रिक व वित्तीय क्षेत्र

**१) पैशाची कार्ये**

**२) भाववाढ**

**३) भारतीय वित्तव्यवस्था**

**४) भारतातील वित्तसंस्था**

**५) नाणेबाजार**

**६) भांडवलबाजार**

## १) पैशाची कार्ये

**१) आधारभूत पैसा**

**२) उच्च शक्ती पैसा**

**३) चलन संख्यामान सिद्धांत**

**४) मुद्रा गुणांक**

१) मुद्रा जे कार्य करते, तीच मुद्रा असते, हे शब्द कोणी उद्‌गारले आहेत ?

१) जे. एम. केन्स २) प्रो. जॉफेरी क्राऊथर ३) फ्राँसीस ए. वॉकर ४) ए. सी. पिगू

२) मध्यवर्ती बँक आणि सरकारने निर्माण केलेल्या पैशाला काय म्हणतात ?

१) शक्तीशाली पैसा २) कागदी पैसा ३) संकुचित पैसा ४) व्यापक पैसा

३) खालीलपैकी कोणती पैशाची प्राथमिक आणि दुय्यम कार्ये नाहीत ?

१) विनिमयाचे माध्यम २) मूल्यमापनाचे साधन ३) विलंबित देणी देण्याचे साधन ४) वरीलपैकी नाही

## २) भाववाढ

**१) भाववाढीचे सिद्धांत –**

१) भाववाढीचा मौद्रिक सिद्धांत

२) भाववाढीचा मौद्रिकेतर सिद्धांत

**२) भाववाढीची कारणे –**

१) मौद्रिक कारणे

२) राजकोषीय कारणे

**३) भाववाढीवरील उपाय –**

१) थेट उपाययोजना

२) भारतातील भाववाढ लक्ष्य

## ३) भारतीय वित्त व्यवस्था

**१) भारतीय वित्त व्यवस्थेची संरचना**

**२) भारतीय रिझर्व्ह बँकेची भूमिका**

**३) मौद्रिक व पतधोरण**

**४) संक्रमण यंत्रणा**

१) शिकागो दृष्टिकोनानुसार पैशाचा पुरवठा म्हणजे ........
पैशाचा पुरवठा (M2) = नोटा व नाणी + अल्पमुदत ठेवी ........
१) बचत ठेवी २) मागणी ठेवी ३) दीर्घ मुदत ठेवी ४) यापैकी नाही

## ४) भारतातील वित्तसंस्था

**१) बँकिंग वित्तसंस्थांचा विकास**

**२) बँकेतर वित्तसंस्थांचा विकास**

१) खालीलपैकी कोणती सुधारणा ही १९९१ च्या नरसिंहम समितीच्या शिफारशीचा भाग नाही ?
१) ज्या व्यापारी बँका भांडवल पूर्ततेचा मानदंड पाळत असतील त्यांना रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीशिवाय नव्या शाखा उघडण्याची मुभा.
२) बँकेच्या कर्जावरील व्याजदराचे थर कमी केले गेले.
३) रोख राखीव निधी (CRR) आणि वैधानिक रोखता प्रमाण (SLR) यांच्यात पुरेशी वृद्धी.
४) न्यूनतम भांडवल प्रमाण हे बेसल मानदंडांवर आधारित असणे.

## ५) नाणेबाजार

१) १९९१ नंतरच्या घडामोडी

## ६) भांडवलबाजार

२) १९९१ नंतरच्या घडामोडी

३) सेबीची भूमिका

४) वित्तीय क्षेत्रातील सुधारणा

# (३) सार्वजनिक वित्त (आयव्यय) आणि वित्तीय संस्था

**१) सार्वजनिक वित्त**

**२) सार्वजनिक गुंतवणूक**

**३) महसूल (केंद्रीय व राज्यस्तरीय**

**४) सार्वजनिक खर्च (केंद्रीय व राज्यस्तरीय)**

**५) अर्थसंकल्प**

**६) केंद्रीय व राज्यस्तरीय तूट**

**७) सार्वजनिक कर्ज**

**८) भारतातील वित्त आयोग**

**९) भारतातील वित्तीय सुधारणा**

## १) सार्वजनिक वित्त

**१) बाजार अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक वित्ताची भूमिका (बाजार अपयश व विकासानुकूलता)**

१) खाली केंद्र राज्य यांच्यातील वित्तीय विवादासंबंधी दोन विधाने दिलेली आहेत. त्यातील योग्य ते निवडा.

a) वित्तीय दृष्ट्या प्रभावी केंद्र आणि प्रभावहीन घटक राज्ये निर्मितीसाठी भारतीय राज्यघटना जबाबदार आहे.

b) केंद्र सरकार अनावश्यक, विभागाची द्विरुक्ती करीत आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) बरोबर आहे २) फक्त (b) बरोबर आहे.

३) (a) आणि (b) दोन्ही अयोग्य आहेत. ४) (a) आणि (b) दोन्ही योग्य आहेत.

२) खालीलपैकी कोणते विधान केन्सच्या सार्वजनिक वित्तव्यवस्थेवरील विचारांचे प्रतिनिधित्व करते ?

१) जेव्हा अर्थव्यवस्थेत संसाधनेच बेकार असतील (न वापरलेली) तेव्हा अर्थसंकल्पाचा आकार लहान व समतोल ठेवणे शहाणपणाचे नसते.

२) अर्थसंकल्पातील तूट टाळली पाहिजे.

३) अर्थसंकल्पातील तूट चलनवाढीस चालना देणारी असते.

४) उपभोगावर कर असणे हे बचतीवर कर असण्यापेक्षा आवश्यक आहे.

## २) सार्वजनिक गुंतवणूक

१) सार्वजनिक गुंतवणुकीचे निकष

२) गुण वस्तू व सार्वजनिक वस्तू

## ३) महसूल (केंद्रीय व राज्यस्तरीय)

**१) सार्वजनिक महसुलाचे स्रोत**

**२) करभार/कराघात व कराचा परिणाम**

**३) करसुधारणांचे समीक्षण**

**४) मूल्यवर्धित कर**

**५) वस्तू व सेवा कर**

१) कर आयात (इन्सिडन्स), हा कर संक्रमण क्रियेचा कोणता परिणाम असतो ?

१) प्रारंभिक २) मध्यम ३) अंतिम ४) यापैकी नाही

२) आर्थिक सुधारणेनंतरच्या काळात भारतात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे सुलभीकरण खालीलपैकी कोणत्या समितीच्या सूचनांनुसार केले गेले ?

१) केळकर समिती २) राजा चेलिया समिती ३) नरसिंहन समिती ४) तेंडुलकर समिती

## ४) सार्वजनिक खर्च (केंद्रीय व राज्यस्तरीय)

१) सार्वजनिक खर्चाचे प्रकार

२) सार्वजनिक खर्चातील वृद्धीची व कारणे

३) सार्वजनिक खर्च सुधारणा

## ५) अर्थसंकल्प

**१) कार्याधारित अर्थसंकल्प**

**२) शून्याधारित अर्थसंकल्प**

**३) लिंगभाव आधारित अर्थसंकल्प**

१) शून्याधारित अर्थसंकल्पाच्या संकल्पनेचा प्रवर्तक कोण आहे?

१) पीटर एस. सन्स २) पीटर ए. पीहर ३) पीटर एम. जॉफरी ४) यापैकी नाही

२) भारतात सर्वप्रथम कोणत्या राज्याने शून्याधारित अंदाजपत्रकाची संकल्पना राबवली ?

१) उत्तर प्रदेश २) महाराष्ट्र ३) आंध्र प्रदेश ४) राजस्थान

३) २०१६-२०१७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये भारत सरकारने अर्थव्यवस्थेतील परकीय थेट गुंतवणूक (FDI) वाढीसाठी २०१७ पूर्वी खालील धोरणात्मक निर्णय घेतले.

**विधाने :**

a) विमा, निवृत्तिवेतन निधी आणि संरक्षण या क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणूक ४९ टक्क्यापर्यंत करण्यास सरकारने परवानगी दिली आहे.

b) भारतात अन्नधान्य उत्पादन उत्पादित करणे आणि त्याची विक्री करणे या क्षेत्रातील १०० टक्के परकीय थेट गुंतवणुकीस सरकारने परवानगी दिली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) योग्य आहे २) फक्त (b) योग्य आहे

३) (a) आणि (b) दोन्ही योग्य आहेत ४) (a) आणि (a) दोन्ही अयोग्य आहेत

## ६) केंद्रीय व राज्यस्तरीय तूट

१) तुटीची संकल्पना

२) अंदाजपत्रकीय तूट

३) राजकोषीय तूट

४) तुटीचे नियंत्रण

५) तुटीचा अर्थभरणा

## ७) सार्वजनिक कर्ज

**१) सार्वजनिक कर्जातील वृद्धी**

**२) सार्वजनिक कर्जाचे घटक व भार**

**३) राज्यांच्या केंद्राकडून असलेल्या ऋणभाराची समस्या**

१) खाली देण्यात आलेल्या **युनिट – I व युनिट – II** मध्ये सार्वजनिक कर्जाशी संबंधित बाबी दिल्या आहेत. योग्य जोडी निवडा.

| **युनिट – I** | **युनिट – II** |
|---|---|
| a) सार्वजनिक कर्ज परतफेडीची पद्धती | i) उत्पादनामध्ये वाढ |
| b) सार्वजनिक कर्जाचे परिणाम | ii) उत्पादक आणि अनुत्पादक सार्वजनिक कर्ज |
| c) सार्वजनिक कर्जाचे स्रोत | iii) तुटीचा अर्थ भरणा |
| d) सार्वजनिक कर्जाचे प्रकार | iv) आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| २) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| ३) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| ४) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

### ८) भारतातील वित्त आयोग

१) भारतातील विविध वित्त आयोग, त्यांचा अंमलबजावणी कालावधी आणि आयोगाचे अध्यक्ष खाली देण्यात आले आहेत. यातील **चुकीचा** पर्याय निवडा.

१) १२ वा वित्त आयोग – २००५–२०१० – सी रंगराजन

२) १३ वा वित्त आयोग– २०१०–२०१५– विजय एल. केळकर

३) १४ वा वित्त आयोग –२०१५–२०२० – वाय. बी. रेड्डी

४) १० वा वित्त आयोग – १९९५–२००० – ए. एम. खुसरो

### ९) भारतातील वित्तीय सुधारणा

## (४) उद्योग व सेवा क्षेत्र

**१) उद्योग क्षेत्र**
**२) सूक्ष्म, लहान व मध्यम उद्योग (एमएसएमई)**
**३) उद्योग क्षेत्राच्या वृद्धीचे स्वरूप**
**४) मोठे उद्योग**
**५) आजारी उद्योग**
**६) औद्योगिक धोरण**
**७) भारतातील सेवा क्षेत्र**
**८) भारतातील श्रमशक्ती**

### १) उद्योग क्षेत्र

**१) आर्थिक आणि सामाजिक विकासातील उद्योगांचे महत्त्व व भूमिका**

१) भारतीय आर्थिक विकासात खालीलपैकी कोणत्या कालावधीला औद्योगिक मंदी आणि संरचनात्मक ऱ्हास असे म्हटले जाते ?

१) १९५१–१९६५ २) १९६६–१९८० ३) १९८१–१९९१ ४) १९९२–२०००

### २) सूक्ष्म, लहान व मध्यम उद्योग क्षेत्र (एमएसएमई)

**१) एमएसएमई क्षेत्राची वृद्धी**
**२) एमएसएमई क्षेत्रातील समस्या**
**३) एमएसएमई क्षेत्राशी संबंधित धोरण**

१) भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम (MSMEs), उद्योगाविषयी खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत?

a) भारताच्या स्थूल मूल्यवाढीत MSMEs क्षेत्राचे योगदान सुमारे ३२% इतके आहे.

b) व्यवसाय विस्तारासाठी पुरेसा कर्जनिधी मिळवताना MSMEs क्षेत्राला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

c) राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ७३ व्या फेरीनुसार २०१५-१६ मध्ये भारतातील MSMEs ची संख्या ६३३.८ लाख इतकी होती.

**पर्यायी उत्तरे :**

१) वरील सर्व   २) केवळ (a) आणि (b)   ३) केवळ (b) आणि (c)   ४) (a) केवळ आणि (c)

२) लघुउद्योगांसंबंधी खाली दोन विधाने दिलेली आहेत. यातील **योग्य** विधानाची निवड करा.

a) लघुउद्योगाच्या विकासासाठी मे १९९९ मध्ये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली.

b) श्री. विजय केळकर हे या अभ्यासगटाचे अध्यक्ष होते.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (b) दोन्हीही योग्य आहेत   २) (a) आणि (b) आणि दोन्हीही अयोग्य आहेत

३) फक्त (a) योग्य आहे.   ४) फक्त (b) योग्य आहे

## ३) उद्योग क्षेत्राच्या वृद्धीचे स्वरूप

१) एसईझेड

२) एसपीव्ही

## ४) मोठे उद्योग

**१) भारतातील मोठ्या उद्योगांची संरचना (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह)**

१) .......... ही कंपनी महारत्न कंपन्यांच्या गटात मोडत नाही. ....

१) हिंदुस्थान पेट्रोलिअम कॉर्पोरेशन मर्यादित (HPCL)

२) राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा कॉर्पोरेशन मर्यादित (NTPC)

३) भारत हेवी इलेक्ट्रिकल लिमिटेड (BHEL)

४) भारत पेट्रोलिअम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL)

## ५) आजारी उद्योग

**१) आजारी उद्योगाची कारणे**

**२) आजारी उद्योगावरील उपाय**

**३) औद्योगिक विकास धोरण**

१) औद्योगिक आजारपण निश्चितीसाठी ........ हा मूलभूत निकष वापरला जातो.

a) सतत १ वर्ष वा त्याहून जास्त काळ वारंवार होणारे रोख नुकसान

b) कर्ज समभाग गुणोत्तरात वाढ

c) उच्च श्रम परिवर्तन दर

d) निव्वळ मालमत्तेत घट

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a)   २) फक्त (a) आणि (b   ३) फक्त (a),(b) आणि (c)   ४) फक्त (b) आणि (c)

२) संस्था आणि त्यांचे महत्त्वाचे उद्दिष्ट यांच्या जोड्या जुळवा:

| संस्था | उद्दिष्ट |
|---|---|
| a) एस आय डी बी आय | i) आजारी उद्योगधंद्यासाठी उपाययोजना |
| b) बी आय एफ आर | ii) आजारी उद्योगधंद्यांना पुनर्वसन |
| c) सी ए आर टी | iii) लघु उद्योगांसाठी केंद्रीय बँक |
| d) आय आर बी आय | iv) ग्रामीण उद्योगांना तांत्रिक सल्ला |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| २) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| ३) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| ४) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

### ६) औद्योगिक धोरण

१) १९९१ च्या पूर्वीची औद्योगिक धोरणे
२) १९९१ नंतरची औद्योगिक धोरणे
३) भारतातील व्यवसाय सुलभता

### ७) भारतातील सेवा क्षेत्र

१) सेवा क्षेत्राची रचना
२) सेवा क्षेत्राची वृद्धी

### ८) भारतातील श्रमशक्ती

१) भारतातील श्रमशक्तीची समस्या, उपाय व सुधारणा
२) सामाजिक सुरक्षा उपाय

## (५) पायाभूत सुविधा विकास

**१) पायाभूत सुविधांचे प्रकार व पायाभूत सुविधांतील वृद्धी**
**२) पायाभूत सुविधा संदर्भातील केंद्र आणि राज्य सरकारची धोरणे**
**३) भारतातील पायाभूत सुविधा संदर्भातील समस्या**
**४) पायाभूत सुविधांसाठीचा वित्त पुरवठा**

### १) पायाभूत सुविधांचे प्रकार व पायाभूत सुविधांतील वृद्धी

**१) ऊर्जा**
**२) पाणी पुरवठा व सफाई**
**३) गृहनिर्माण – परवडणारी घरे, झोपडपट्टी पुनर्वसन**
**४) वाहतूक – रस्ते, बंदरे**
**५) दळणवळण व दूरसंचार – पोस्ट व टेलिग्राफ, रेडिओ, दूरचित्रवाणी व इंटरनेट जाळे**

१) भारतातील रस्त्यांच्या वर्गीकरणात खालीलपैकी कोणत्या रस्त्यांच्या प्रकाराचा समावेश होतो ?

१) राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, शहरी रस्ते

२) राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा महामार्ग, शहरी व ग्रामीण भागातील रस्ते.

३) राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा व ग्रामीण भागातील रस्ते.

४) राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण भागातील रस्ते, शहरालगतचे महामार्ग.

२) भारतात रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या २०१६-१७ च्या वार्षिक अहवालानुसार किती लांबीचे राष्ट्रीय आणि राज्य महामार्ग आहेत ?

१) राष्ट्रीय १०३९२२ कि. मी. आणि राज्य १६१८८७ कि. मी.

२) राष्ट्रीय १०३८३३ कि. मी. आणि राज्य १६०३८२ कि. मी.

३) राष्ट्रीय १०३९३३ कि. मी. आणि राज्य १६१४८७ कि. मी.

४) राष्ट्रीय १०४९३३ कि. मी. आणि राज्य १५९३६२ कि. मी.

३) राष्ट्रीय संप्रेषण धोरणाची (२०१८) उद्दिष्टे, २०२२ या वर्षापर्यंत साध्य करायची आहेत. ती म्हणजे ..........

a) डिजिटल सबलीकरण करणे.

b) भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात डिजिटल संप्रेषणाचा वाटा १०% पर्यंत वाढवणे.

c) सर्वांना ब्रॉडबॅण्ड सेवेचा पुरवठा

d) जागतिक मूल्यसाखळीत भारताचे योगदान वाढवणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (b) आणि (c)   २) (a) ,(c) आणि (d)   ३) (b),(c) आणि (d)   ४) (a), (b) आणि (d)

## २) पायाभूत सुविधा संदर्भातील केंद्र आणि राज्य सरकारची धोरणे

**१) पायाभूत सुविधा संदर्भातील केंद्र सरकारचे धोरण**

**२) पायाभूत सुविधा संदर्भातील राज्य सरकारचे धोरण**

**३) विशेष उद्देश साधने (एसपीव्ही)**

१) शहर सुधारणा, शहर नूतनीकरण आणि शहर विस्तार हे .......... या योजनेचे संरचनात्मक घटक आहेत.

a) स्मार्ट सिटीज अभियान

b) राष्ट्रीय वारसा शहर विकास व वृद्धी योजना

c) अटल नूतनीकरण आणि शहरी परिवर्तन अभियान

**पर्यायी उत्तरे :**

१) (a)   २) (b)   ३) (c)   ४) वरीलपैकी कोणताही पर्याय नाही

## ३) भारतातील पायाभूत सुविधा संदर्भातील समस्या

## ४) पायाभूत सुविधांसाठीचा वित्त पुरवठा

**१) पायाभूत सुविधांसाठी वित्त पुरवठ्याची आव्हाने व धोरण पर्याय**

**२) सार्वजनिक-खाजगी क्षेत्र भागीदारी (पीपीपी)**

**३) थेट परकीय गुंतवणूक व पायाभूत सुविधा विकास**

**४) पायाभूत सुविधा विकासाचे खाजगीकरण**

१) पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीत खाजगी भागीदारीस प्रोत्साहन देण्यासाठीच्या अनेक मार्गांमधील एक मार्ग म्हणजे बी ओ टी खालील पर्यायांपैकी कोणता पर्याय बी ओ टी चे विस्तारित स्वरुप आहे ?

१) बिल्ड, ऑपरेट आणि ट्रान्सफर   २) बिल्ड, ओन आणि ट्रान्सफर
३) बॉरो, ऑपरेट आणि ट्रान्सफर   ४) बिल्ड, ऑपरेट आणि टेकओव्हर

# (६) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

**१) उर्वरित भारताच्या तुलनेत महाराष्ट्र**
**२) महाराष्ट्रातील विविध क्षेत्राची वैशिष्ट्ये**
**३) कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र सरकारची धोरणे**
**४) महाराष्ट्रातील दुष्काळ व्यवस्थापन**
**५) महाराष्ट्रामधील परकीय गुंतवणूक**

## १) उर्वरित भारताच्या तुलनेत महाराष्ट्र

## २) महाराष्ट्रातील विविध क्षेत्राची वैशिष्ट्ये

**१) कृषी क्षेत्राची वैशिष्ट्ये**
**२) उद्योग क्षेत्राची वैशिष्ट्ये**
**३) सेवा क्षेत्राची वैशिष्ट्ये**

१) १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्याला केंद्र सरकारच्या कर उत्पन्नाचा ....... इतका वाटा मिळालेला आहे.

१) १७.९५९   २) ९.६६५   ३) ५.५२१   ४)७.५४८

## ३) विविध क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र सरकारची धोरणे

**१) कृषी क्षेत्राच्या विकासाचे धोरण**
**२) उद्योग क्षेत्राच्या विकासाचे धोरण**
**३) सेवा क्षेत्राच्या विकासाचे धोरण**

१) महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना कधी सुरु केली ?

१) जून २०१७   २) जुलै २०१६   ३) जून २०१८   ४) ऑगस्ट २०१७

२) महाराष्ट्रातील सिंचन घोटाळ्याच्या तपासासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली ...........साली विशेष तपास पथक (SIT) ची स्थापना केली.

१) २०१०-११   २) २०११-१२   ३) २०१३-१४   ४) २०१२-१३

३) खालील विधाने विचारात घ्या.

a) महाराष्ट्र राज्याने सेंद्रीय शेती धोरण जानेवारी २०१३ मध्ये जाहीर केले.
b) महाराष्ट्र राज्याने कृषी संजीवनी योजना २०११ मध्ये जाहीर केली.
c) महाराष्ट्र राज्याने शेती व्यवसाय पायाभूत विकास गुंतवणूक कार्यक्रम जागतिक बँकेच्या मदतीने सुरु केली.
वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **असत्य** आहे/त ?

१) (a) व (b)   २) फक्त (a)   ३) (b) व (c)   ४) फक्त (c)

### ४) महाराष्ट्रातील दुष्काळ व्यवस्थापन

### ५) महाराष्ट्रामधील परकीय गुंतवणूक

१) महाराष्ट्राच्या २०१७-१८ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार सप्टेंबर २०१७ पर्यंत भारतातील एकूण परकीय थेट गुंतवणुकीत महाराष्ट्राचा वाटा किती आहे ?

१) ३१% २) २५% ३) ३९% ४) २१%

२) महाराष्ट्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक प्रकल्पात झालेल्या गुंतवणुकीमध्ये खालीलपैकी कोणत्या क्षेत्राचा प्रथम क्रमांक लागतो ?

१) हॉटेल व पर्यटन उद्योग क्षेत्र २) वित्तीय सेवा क्षेत्र

३) व्यवसाय व्यवस्थापन सल्लाविषयक क्षेत्र ४) माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र

# (३) कृषी अर्थव्यवस्था

## (१) भारतीय शेती व ग्रामीण विकास

१) आर्थिक विकासात शेतीची भूमिका
२) शेतीचे प्रकार
३) कृषी उत्पादकता व उत्पादन वाढीसाठी शासकीय धोरणे, योजना आणि कार्यक्रम
४) भारत व महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा विकास
५) कृषी संशोधन
६) ग्रामीण विकास

### १) आर्थिक विकासात शेतीची भूमिका

**१) राष्ट्रीय उत्पन्न आणि रोजगारामध्ये शेतीचे योगदान**
**२) शेती, उद्योग व सेवा क्षेत्रांमधील आंतरसंबंध**
**३) भारतातील कृषी विकासातील प्रादेशिक असमानता**

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राच्या भूमिकेसंबंधी खाली काही विधाने देण्यात आली आहेत. यातील योग्य विधान/विधानांची निवड करा.

a) १९७२-१९७३ मध्ये भारताच्या काम करणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी ७३.९% लोक शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसायामध्ये गुंतलेले होते. हे प्रमाण कमी होऊन १९९३-१९९४ मध्ये ६४.८% तर २०११-२०१२ मध्ये ४८.९% पर्यंत खाली आले.

b) कृषी क्षेत्राच्या विकासाशिवाय देशातील उद्योगधंदे अविकसित (मागास) राहतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (b) योग्य आहेत २) फक्त (a) योग्य आहे

३) फक्त (b) योग्य आहे ४) (a) आणि (b) अयोग्य आहेत

## २) शेतीचे प्रकार

**१) कंत्राटी शेती**
**२) उपग्रह शेती**
**३) कॉर्पोरेट शेती**
**४) सेंद्रिय शेती**

१) राष्ट्रीय सेंद्रीय शेती प्रकल्प योजनेची ........ हे/ही मुख्य उद्दिष्ट/उद्दिष्ट्ये आहेत/आहे.
१) सेवा पुरविणाऱ्यांच्या मार्फत क्षमता विकसित करणे.
२) प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मानवी संसाधनांचा विकास करणे.
३) सेंद्रीय आदानांची गुणवत्तेवर नियंत्रण करणे.
४) वरील सर्व

## ३) कृषी उत्पादकता व उत्पादन वाढीसाठी शासकीय धोरणे, योजना आणि कार्यक्रम

**१) भारतातील कमी कृषी उत्पादनक्षमतेची कारणे – मूलभूत शेतीविषयक निविष्ठा, शेतीचे आकारमान**
**२) हरित क्रांती व तंत्रज्ञान विषयक बदल, जनुकीय सुधारणा तंत्रज्ञान**
**३) शेतीचे यांत्रिकीकरण**
**४) शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याबाबत शासकीय धोरण**
**५) विविध पिक विमा योजना**

१) खालील विधाने भारतीय हरितक्रांती विषयीची आहेत.
a) पिकांच्या आकृतिबंधात बदल झाला.
b) शेती आणि उद्योगधंद्यामधील आंतर–जोडणी मजबूत झाली.
c) हरितक्रांतीचा फायदा झालेली गहू आणि तांदूळ ही दोन पिके आहेत.
वरीलपैकी कोणते विधान/विधाने खरी आहेत ?
१) सर्व (a), (b) आणि (c) २) फक्त (c) ३) फक्त (a) ४) (a) आणि (c)

२) खालील विधाने भारतीय शेतीविषयक आहेत.
a) प्रती हेक्टर उत्पादनाच्या आधारे गहू या पिकाचा प्रथम क्रमांक लागतो.
b) एकूण उत्पादनाच्या आधारे तांदूळ या पिकाचा प्रथम क्रमांक लागतो.
खालील कोणता पर्याय बरोबर आहे ?
१) दोन्ही विधाने बरोबर आहेत २) दोन्ही विधाने चुकीची आहेत.
३) फक्त विधान (a) खरे आहे. ४) फक्त विधान (b) खरे आहे.

३) शेण खतांमध्ये ........... टक्के नत्र असते.
१) ९.३० २) ०.५० ३) १६.०० ४) ४६.४०

४) १९५०–१९५१ मध्ये भारतातील खताचा प्रतिहेक्टरी वापर नगण्य होता. मात्र २०१४–२०१५ मध्ये हा वापर .......... किलोपर्यंत प्रतिहेक्टरी वाढला.
१) २०० किग्रॅ. २) १२५.४ किग्रॅ. ३) ५०० किग्रॅ. ४) ४३५.५ किग्रॅ.

५) भारत सरकारने २००४ मध्ये बियाणे विधेयक २००४' सादर केले. या विधेयकाची वैशिष्ट्ये .........
१) बियाणांच्या जातीची त्याच्या उत्पादक क्षमतेनुसार सक्तीची नोंदणी.

२) बियाणांची आयात – निर्यात करण्यासाठीची नियमावली

३) शेतकऱ्यांना त्यांच्याकडील बियाणे जतन करणे, त्याचा वापर करणे, अदलाबदल करणे, वाटून घेणे आणि विक्री करणे यासाठी नोंदणीपासून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यात आली.

४) वरील सर्व

६) मिशन २०२२ : आगामी पाच वर्षात भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे. यासाठी प्रधानमंत्री यांनी खालील धोरण निश्चित केले आहे. यातील योग्य पर्यायांची निवड करा.

a) जलसंधारणासाठी मोदी अर्थसंकल्पीय तरतूद करुन जलसंधारणावर लक्ष केंद्रित करणे. प्रत्येक थेंब–जास्त पीक या ध्येयासाठी प्रयत्न करणे.

b) काढणी पश्चात पिकांची हानी टाळण्यासाठी साठवणगृहासाठी मोठी गुंतवणूक करणे आणि शीतगृहांची साखळी निर्माण करणे.

c) परवडणाऱ्या खर्चात शेती क्षेत्रातील धोका कमी करण्यासाठी नवीन पीक विमा योजना सुरु करणे.

d) गुणवत्तापूर्ण बियाणांची तरतूद करणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (b) योग्य आहेत २) (c) आणि (d) योग्य आहेत

३) (a) आणि (d) योग्य आहेत ४) वरील सर्व योग्य आहेत

## ४) भारत व महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा विकास

**१) जमीन सुधारणा आणि जमीन वापर**

**२) जलसिंचन आणि जलव्यवस्थापन**

**३) फलोत्पादन व पुष्पोत्पादन विकास**

**४) पशुधन आणि त्याची उत्पादकता**

**५) वनीकरण**

**६) मत्स्यव्यवसाय**

## १) जमीन सुधारणा आणि जमीन वापर

१) मशागत योग्य पडीक जमिनीचे महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्राशी ........ % एवढे प्रमाण आहे.

१) २.९८ २) २४.०५ ३) १४.४५ ४) १०.४८

२) .......... प्रकारची भूमी स्वामित्व प्रणाली सर्वप्रथम १७९२ मध्ये मद्रास प्रांतात सुरु झाली.

१) रयतवारी २) जमीनदारी ३) महालवारी ४) वरीलपैकी कोणतेही नाही

३) महाराष्ट्रात सामान्यत: कोणती व्यापारी/नगदी पिके खरीप हंगामात घेतली जातात ?

१) कापूस, सोयाबीन, गहू, हरभरा २) कापूस, सोयाबीन, भुईमूग, ऊस

३) कापूस, सोयाबीन, जवस, हरभरा ४) कापूस, सोयाबीन, कडधान्ये, ज्वारी

## २) जलसिंचन आणि जलव्यवस्थापन

**१) मृद आणि जलसंधारण**

**२) पर्जन्य शेती**

**३) सिंचन आणि त्याच्या पद्धती**

१) भारतातील शेती सिंचनाचा सर्वात मोठा स्त्रोत कोणता ?

१) कालवे २) विहिरी ३) तलाव ४) वरीलपैकी कोणताही नाही

२) मृद व जल संधारण विभागातर्फे .............. या योजनेला नाबार्ड मार्फत २०००-२००१ सालापासून कर्जपुरवठा केला जातो.

१) ए आय बी पी
२) डब्ल्यू डी पी एस सी ए
३) आर आय डी एफ
४) आर व्ही पी आणि एफ पी आर

## ३) फलोत्पादन व पुष्पोत्पादन विकास

१) .......... हे/हा कार्यक्रम १२ व्या (२०१२-२०१७) पंचवार्षिक योजनेनुसार एकात्मिक फळबाग विकास कार्यक्रमाचा भाग आहे/आहेत.

a) ईशान्य भारतीय प्रदेश आणि हिमालय फळबाग अभियान (HMNEH)
b) राष्ट्रीय बांबू अभियान (NBM)
c) नारळ विकास मंडळ(CDB)
d) राष्ट्रीय फळबाग अभियान (NHM)

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (b) आणि (d)  २) (a),(c) आणि (d)  ३) (a), (b),(c) आणि (d)  ४) (b),(c) आणि (d)

## THIS SAMPLE IS OVER

To buy complete MPSC Mains GS I course click on the link below -
https://www.studycircleonline.com/notes/GSIV-AGRI-ECO/156
To buy complete MPSC Mains course incusive of the complete syllabus click on the link below-
https://www.studycircleonline.com/courses/mpsc-mains-20-21-complete-course-/13
or visit www.studycircleonline.com